|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र.कबचौउमवि/विवि/१४/फा.से.कार्य/ १८/२०२६ दि.२४/०१/२०२६

प्रति,

**मा.प्राचार्य / मा. संचालक,**
**जळगाव जिल्हयातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये / मान्यता प्राप्त परिसंस्था**
**यांना -**

**विषयः-जळगाव जिल्हास्तरीय फायर सेफ्टी कार्यशाळेस विद्यार्थी पाठवणेबाबत.....**

महोदय / महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत पदवी-पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा याकरीता सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शने आयोजित केली जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा, त्यास सभोवतालचे वातावरण अवगत व्हावे, श्रमसंस्कृतीची जाण व्हावी, सांस्कृतिक कला जोपासली जावी असा प्रयत्न विभागाद्वारे केला जात आहे.

विद्यार्थ्यांना आगीपासून वाचविण्याचे काही सोपे मार्ग लक्षात यावे जेणेकरुन आगीचे अपघात टाळता येवू शकतात. आगीचा कहर रोखण्यासाठी आणि आगीपासून जिवीतहानी टाळण्यासाठी **जळगाव जिल्हास्तरीय फायर सेफ्टी कार्यशाळा दि. 10 व 11 फेब्रुवारी 2026** या कालावधीत **मु.ता.ए.सोसाचे श्रीमती गोदावरीबाई गणपतराव खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर. जि. जळगाव** येथे आयोजित केलेली आहे.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, फायर सेफ्टी कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांना आगीपासून बचाव करण्यासाठी कौशल्य शैलीच्या तज्ञांना बोलावून मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यासाठी आपल्या महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्था / शैक्षणिक प्रशाळा विभाग मधील खालील निकषानुसार **06 विद्यार्थी (3 विद्यार्थी व 3 विद्यार्थिनी)** निवड करून पाठवावेत, ही विनंती.

* सदर विद्यार्थी गुणवत्ताधारक, आज्ञाधारक, कुशल, धाडसी निर्णय घेणारा व नेतृत्व गुण सांभाळणारा असावा.
* सदर विद्यार्थी या शैक्षणिक वर्षात (सन 2025-26) नियमित शिक्षण घेणारा असावा. त्याच्या/तिच्याकडे अद्यावत (प्राचार्य/संचालक यांच्या सही व शिक्का असलेले) ओळखपत्र असावे.

कृपया निकषानुसार कार्यशाळेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवास, चहा अल्पोहार व भोजन व्यवस्था आयोजकांमार्फत निःशुल्क केली जाईल. मात्र त्यांचा येण्याजाण्याचा प्रवासखर्च विद्यार्थी प्रवास सवलत दराने महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास निधीतून करावा.

**कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक सूचना :-**

* फायर सेफ्टी कार्यशाळा उद्‌घाटन सोहळा **दि. 10 फेब्रुवारी 2026** रोजी सकाळी 10.00 वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. **तसेच विद्यार्थ्यांनी सकाळी 9.30 वाजेपर्यंत श्रीमती गोदावरीबाई गणपतराव खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर. जि. जळगाव** येथे हजर रहावे**.**
* कार्यशाळा कालावधी **2** दिवसांचा असल्याने विद्यार्थ्यांनी गरजेनुसार आवश्यक साहित्य, पाणी बॉटल, पांघरुण, गरम कपडे, बॅटरी, कापडी बुट-मोजे तसेच गरजेनुसार आवश्यक औषधी सोबत आणावी. कृपया विद्यार्थ्यांनी मौल्यवान वस्तू / मोबाईल वा गरजेपेक्षा अधिक रक्कम सोबत आणू नये.
* कार्यशाळेला केवळ 03 विद्यार्थी व 03 विद्यार्थिनी यांचीच निवड करून त्यांना पाठवावे. निर्धारीत संख्येपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही. कार्यशाळेत 03 विद्यार्थी व 03 विद्यार्थिनी येणे आवश्यक आहे. जर विद्यार्थिनी ऐवजी 06 विद्यार्थी पाठविलेत तर त्यांचा प्रवेश नाकारला जाईल (फक्त मुलींचे महाविद्यालय / परिसंस्था वगळून) याची कृपया नोंद घ्यावी.

* कार्यशाळेत विद्यार्थ्यांची गटवार विभागणी करण्यात येत असल्याने त्यांना मिळालेल्या गटातच प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहिल.

* कार्यशाळा कालावधीत मित्र, मैत्रिण, अथवा स्थानिक नातेवाईक यांना भेटीसाठी बोलविता येणार नाही. तसेच गैरवर्तन आढळल्यास विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून तात्काळ परत पाठविण्यात येईल.

* **कार्यशाळेच्या अनुषंगाने आवश्यक माहिती व संपर्कासाठी -**

1. मा. प्राचार्य डॉ. एच. ए. महाजन, भ्रमणध्वनी क्र. 9404490246
   ई-मेल, khadse_college1990@rediffmail.com
2. डॉ. अतुल चंद्रशेखर बढे, विद्यार्थी विकास अधिकारी, भ्रमणध्वनी क्र. 9405055655

उपरोक्त अनुषंगाने आपणांस पुन:श्च कळवितो की, फायर सेफ्टी कार्यशाळेत निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठामार्फत पुरविलेल्या नमुन्यातील अर्ज, पालकांचे संमतीपत्रक व आपले शिफारसपत्र **दि.07/02/2026** पर्यंत **श्रीमती गोदावरीबाई गणपतराव खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर. जि. जळगाव.** ई.पत्ता khadse_college1990@rediffmail.com पाठवून सहकार्य करावे व विद्यार्थ्यांना परिपत्रकातील सुचनेप्रमाणे उपस्थित राहाण्याच्या सूचना द्याव्यात. सदर परिपत्रक व विद्यार्थी स्वंयवृत्त विद्यापीठ **www.nmu.ac.in** या संकेत स्थळावर भेट दिल्यास उपलब्ध आहे.

आपला विश्वासू,

(डॉ.जयेंद्र दि.लेकुरवाळे)
संचालक, विद्यार्थी विकास

* **सोबत :-** विद्यार्थी स्वयंवृत्त

* **प्रत माहितीसाठी :-**

१. मा. प्राचार्य, श्रीमती गोदावरीबाई गणपतराव खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर. जि. जळगाव.
२. डॉ. संजय काशिनाथ पाटील,जळगाव जिल्हा समन्वयक, पंकज महाविद्यालय, चोपडा.
३. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
४. मा.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
५. मा.पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

Xpdata/mpp/Fire Safety २०२५-२६

पासपोर्ट
साईज रंगीत
फोटो

## विद्यार्थी स्वयंवृत्त

# जळगाव जिल्हास्तरीय फायर सेफ्टी कार्यशाळा

1) विद्यार्थ्याचे नाव (आडनाव प्रथम) :- ------------------------------------------------------------

2) वर्ग :- -------------

3) जन्म तारीख :- / /

4) शारीरिक दृष्ट्या सक्षम :- होय / नाही

5) रक्त गट :- ------

6) पत्र व्यवहार पत्ता (निवास) :- --------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------

7) भ्रमणध्वनी क्र. :-

8) महाविद्यालय/परिसंस्था/प्रशाळा यांचे नाव :- --------------------------------------------------

9) ओळखपत्र क्र. :- -----------------

10) विद्यार्थी विकास उपक्रम सहभाग :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

11) स्वयंपूर्तीने आयोजित कार्यक्रम :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

**विद्यार्थी / विद्यार्थीनीची सही व नाव**

---

**-: पालकाचे संमती पत्र :-**

संमती पत्र लिहून देतो/देते की, श्री/सौ./ ------------------------------------------ माझा पाल्य मुलगा/मुलगी नामे ---------------------------------------- हा/ही फायर सेफ्टी कार्यशाळेत स्वयंप्रेरणेने व माझ्या सहमतीने सहभागी होत आहे. त्याला/तिला प्रवास व कार्यशाळा सहभाग कालावधीमध्ये शारीरिक दुखापत, मोठी हानी झाल्यास महाविद्यालय/विद्यापीठ यांना जबाबदार धरणार नाही. त्यांच्याकडे कोणताही नुकसान भरपाई व मानहानी दावा करणार नाही.

**पालक/वडील/आई यांचे नाव व स्वाक्षरी**

---

**-: महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था/शैक्षणिक प्रशाळा विभाग यांचे शिफारस पत्र :-**

विद्यार्थी नाव -------------------------------- हा/ही नियमित शिक्षण घेत असून नमूद माहिती नोंदी प्रमाणे बरोबर आहे. फायर सेफ्टी कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी शिफारस करीत आहे.

दिनांक :- / /2026

**विद्यार्थी विकास अधिकारी**
नाव व सही

**प्राचार्य/संचालक**
सही व शिक्का